**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०२ श्री पाराजी पांडुरंग जानकर यांचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम.एस.काझी यांचेकडुन शपथेवर सुरु</u> –**

**०१.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ची बहीण माझी पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ माझे मेहुणे असल्याने मी साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १४३ व २३४ या वादी व प्रतिवादी च्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या जमीनीचे पुर्वीचे मालक माणिक वामन चोरमले हे होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना पत्नी गंगुबाई व आसाराम आणि प्रल्हाद हे दोन मुले होते. हे म्हणणे खरे आहे की, गंगुबाई, आसाराम आणि प्रल्हाद हे तीघेही मयत आहेत.

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, आसाराम यांना प्रतिवादी क्र. १ व जितेंद्र ही मुले आणि मंगल व लता या दोन मुली वारस आहेत. मी सांगतो की लता मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रल्हाद यांना किसनाबाई पत्नी आणि वादी ही मुलगी आहे. किसनाबाई यांनी प्रतिवादी क्र. १ ला दत्तक घेतेवेळी त्यांचे पती प्रल्हाद हयात नव्हते. हे मला सांगता येणार नाही की, दत्तक घेण्यापुर्वी प्रल्हाद किती वर्ष आधी वारले होते. लक्ष्मण यांच्या दत्तक पत्रावर मी साक्षीदार म्हणून सही केली नव्हती. साक्षीदाराला आता नि. ६२ येथील दत्तकपत्राची मुळ प्रत दाखविण्यात आली. यावर साक्षीदार क्र. १ म्हणून माझीच सही आहे.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, त्या दत्तकपत्रामध्ये किसनाबाई यांनी त्यांना मुलगी आहे असे लिहून दिले आहे. हे मला सांगता येणार नाही की, वादीच्या पतीच्या नावे गुळज, गेवराई, बीड येथील सर्वे नं. २१४ मधील ४० आर जमीन किसनाबाई चोरमले कधी, कुणाकडुन किती रुपयांसाठी व कोणत्या खरेदीखताद्वारे करुन दिली होती.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.21 16:55:53 +0530

०४. हे मला सांगता येणार नाही की, त्या खरेदीखताचे साक्षीदार कोण होते. मला सांगता येणार नाही की, त्या खरेदीखतामध्ये काय मजकुर होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरील खरेदीखतासंदर्भातील माझी ऐकिव माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या संदर्भात माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही.

०५. प्रल्हाद माणिक चोरमले व त्यांचे भाऊ आसाराम चोरमले यांनी बागपिंपळगाव येथील गट नं. १६९ मधील २ आर जमीन ३१ वर्षापुर्वी दोन्ही भावांनी मिळून घर बांधण्यासाठी खरेदीकेल्याबाबत कधी, कोणामध्ये, किती मोबदल्याकरीता कोणत्या नंबरचे खरेदीखत झाले हे मला सांगता येणार नाही. मला खरेदीखताचे साक्षीदार, घेणार, देणार कोण होते हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रल्हाद आणि आसाराम यांनी केलेलया खरेदीखतासदंर्भात माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची बाब मी ऐकिव माहितीवरुन कथन केली आहे.

०६. २०२२ साली गुढीपाडव्यानंतर आशाबाई मदने ही लक्ष्मण चोरमले यांच्या घरी येवून रक्कम रुपये ५०,०००/– उसणे घेवून गेल्याबाबत कागदपत्री व्यवहार झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, रक्कम रुपये ५०,०००/– घेवून गेल्याबाबत माझ्याकडे कोणताही पुरावा नाही.

०७. वादीने वाद मिळकतीमधील हक्क सोडून दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री दस्त झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, ही देखील माझी ऐकिव माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला तिच्या वडीलोपार्जित मिळकतीत मिळलेला हिस्सा वादीने प्रतिवादी क्र. १ कडून वाटप करुन मागितला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ने त्याला नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ माझा मेहूणा असल्याने व वादीला हिस्सा मिळू नये अशी इच्छा असल्याने आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, किसनाबाई चोरमले हीने गट नं. १४३ व २३४ मधील वादग्रस्त मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या एकटयाच्या ताब्यात दिली होती हे मी खोटे नमुद करीत आहे.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.21 16:55:57 +0530

०८.		हे म्हणणे खरे नाही की, किसनाबाई चोरमले हिने वादीच्या पतीच्या नावे ४० आर जमीन सर्वे नं. २१४ मध्ये खरेदी करुन दिली होती, हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, प्रल्हाद व आसाराम यांनी गट नं. १६९ मधील २ आर जमीन एकत्रित खरेदी केली होती, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ने गट नं. १४३  मधील  १ हे. १५ आर व गट नं. २३४ मधील ३६ .५० आर हे क्षेत्र त्यांच्या मुलांच्या आणि पत्नीच्या नावे करुन दिले हे मी खोटे नमुद करीत आहे.

०९.		हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ला मदत व्हावी म्हणून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.21 16:56:00 +0530

**गेवराई** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. २१/०४/२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर गेवराई.**